संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३४/२०१५

निशाणी – ०२

## मालवण येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय

## आरोपीचे प्रकथन

१. अपराध घडल्याचा दिनांक : २९/०३/२०१५
२. अहवालाचा/फिर्याद दिनांक : ०१/०४/२०१५
३. फिर्यादीचे नांव, वय व पत्ता : सरकारतर्फे विठ्ठल वसंत धुरी
पो.कॉ.ब.नं. ५६१ मालवण पोलीस ठाणे.
४. आरोपीचे नांव, वय व पत्ता : अक्षय मंगेश चव्हाण, वय १९ वर्षे,
रा. धुरीवाडा साईमंदिर नजीक, मालवण
ता.मालवण. जि.सिंधुदुर्ग.

५. अपराधाचा तपशील :–

दिनांक २९/०३/२०१५ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास गाव मौजे भरड मालवण, ता. मालवण येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील हिरो कंपनीची पॅशन प्लस मोटार सायकल नं. एम एच/०७ एम ६९०८ ही धुरीवाडा ते सोमवारपेठ मालवण अशी तुमच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना नसताना चालवित असताना मिळून आलात व त्याव्दारे तुम्ही मोटार वाहन अधिनियम कलम ३/१८१ अन्वये शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगीरीत येणारा गुन्हा केला.

६. आरोपीचे प्रतिकथन :–

प्रश्न १: तुम्हाला अदखलपात्र गुन्हयाच्या कागदांच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर : होय.
प्रश्न २: तुम्हाला अपराधाचा मजकुर समजला काय ?
उत्तर : होय.
प्रश्न ३: तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर : होय, मला कबुल आहे.

__________________

आरोपीची स्वाक्षरी समक्ष,

दिनांक : ११/०४/२०१५

( खा. अ. भेंडवडे )
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, मालवण.

# <u>न्यायनिर्णय</u>

( <u>दिनांक ११/०४/२०१५ रोजी घोषित</u> )

आरोपी आजरोजी राष्ट्रीय महालोक अदालतमध्ये नोटीस प्रमाणे हजर झालेला आहे. त्याला निशाणी ०२ वरील आरोपांचा तपशील समजावून सांगितला असता आरोपी याने त्याला त्याचे वरील गुन्हा मान्य असल्याचे सांगितले. आरोपी याची सदरची कबूली ही स्वेच्छेची असल्याने ती स्विकारण्यात आली. आरोपी यास शिक्षेबाबत काही सांगावयाचे आहे काय, अशी विचारणा केली असता आरोपी याने सदरचा त्याचा पहिलाच अपराध आहे, असे सांगून शिक्षेबाबत सौम्य दृष्टीकोन ठेवण्यात यावा, असे सांगितले. सहा. सरकारी वकिलांनी आरोपीस जास्तीत जास्त दंड करण्यात यावा असे सांगितले. आरोपी विरूध्दचा सदरचा अपराध हा पहिलाच अपराध असल्याचे अभिलेखावरून दिसून येते. आरोपी याची आर्थिक स्थिती चांगली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. आरोपीने कोणतीही दक्षता न घेता वाहन चालविलेले आहे, असे दिसून येते. त्यामुळे आरोपी यास त्याचेविरूध्द तोहमत असलेल्या गुन्हयाबाबत दोषी धरून खालील प्रमाणे शिक्षा देण्यात येत आहे.

१. आरोपी अक्षय मंगेश चव्हाण यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये त्याचेविरूध्द मोटार वाहन अधिनियम कलम ३/१८१ अन्वये तोहमत प्रमाणे शिक्षापात्र अपराधाबाबत दोषी धरण्यात येत आहे.

२. आरोपी याने मोटार वाहन अधिनियम कलम ३/१८१ अन्वये केलेल्या अपराधाबाबत रक्कम रुपये ५००/— चा द्रव्यदंड, दंड न भरल्यास १० दिवस साधी कैद याप्रमाणे शिक्षा देण्यात येत आहे.

३. सदर न्यायनिर्णयाची मोफत प्रत आरोपीस देण्याची आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित व पारित करण्यात आला.)

सही/—

दिनांक : ११/०४/२०१५.

( खा. अ. भेंडवडे )
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, मालवण.